
दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | रविवार, 29 मार्च 2026 | अंक क्र. 309 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




## परळीतील धक्कादायक प्रकार

# दीड वर्षाच्या चिमुरडीला बसस्थानकात सोडून महिला फरार

## बाथरूमला जाऊन येते म्हणून काढला पळ

**परळी (नितीन ढाकणे)**

परळी बसस्थानकात एक अत्यंत धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. दीड वर्षांच्या चिमुरडीला जाणीवपूर्वक बस स्थानकात सोडून देण्यात आल्याचा प्रकार समोर आला असून, याप्रकरणी पोलिस तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि. ३० जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास परळी एस.टी. बसस्थानक येथे एक अनोळखी महिला दीड वर्षांच्या मुलीसह आली होती. तिने तोंडाला रुमाल बांधलेला होता. उपस्थित महिलांना तिने “मी बाथरूमला जाते, थोडावेळ मुलीला सांभाळा” असे सांगून ती तेथून निघून गेली. मात्र बराच वेळ उलटूनही ती परत न आल्याने संशय निर्माण झाला.दरम्यान, अनेक दिवस शोध घेऊनही मुलीचे नातेवाईक किंवा पालक यांचा काहीही मागमूस लागलेला नाही. त्यामुळे ही मुलगी जाणीवपूर्वक ठेवून गेल्याचा संशय अधिक बळावला आहे.

या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, अशा प्रकारे निरागस जीवाला टाकून देणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. पोलिस सध्या त्या अनोळखी महिलेचा शोध घेत असून, सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास वेगाने सुरू आहे.या प्रकरणी सालोमन मायकल कसबेकर (वय 52), अधीक्षक, आशा शिशुगृह, परभणी यांनी 26 मार्च 2026 रोजी संभाजीनगर परळी वैजनाथ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम 93 अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक ए. टी. शिंदे करीत असून, संबंधित मुलीचे आई-वडील किंवा पालकांचा शोध घेणे हे सध्या पोलिसांसमोरचे सर्वात मोठे आव्हान ठरले आहे. निर्दोष बालकाचे भवितव्य अंधारात? या घटनेमुळे समाजमन हेलावून गेले असून, एका निष्पाप जीवाला अशा अवस्थेत सोडून देणाऱ्यांविरोधात संताप व्यक्त केला जात आहे. आता या चिमुकलीला न्याय मिळवून देत तिच्या कुटुंबाचा शोध लावणे, हीच खरी कसोटी प्रशासनासमोर उभी आहे.




### संपर्क येथे साधवा

| डी एस ढोणे<br>मोबाईल नंबर - 9850009810<br>पोलीस निरीक्षक संभाजीनगर पोलीस स्टेशन परळी | ए टी शिंदे<br>मोबाईल नंबर - 9881745820<br>पोलीस उपनिरीक्षक<br>संभाजीनगर पोलीस स्टेशन परळी |
|---|---|

सदर घटनेचा तपास पोलीसांकडून अत्यंत वेगाने सुरू असून, लवकरच या चिमुकलीच्या आई-वडिलांपर्यंत पोहोचण्यात यश मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, या मुलीबाबत किंवा तिच्या पालकांबाबत कोणतीही माहिती असल्यास तात्काळ संभाजीनगर परळी वैजनाथ पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा. माहिती देणाऱ्याचे नाव पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येईल.

— धनंजय ढोणे, पोलीस निरीक्षक संभाजीनगर पोलीस स्टेशन, परळी





# रेणापूर नगरपंचायतीच्या सक्शन मशीनचे आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते लोकार्पण

**लातूर | प्रतिनिधी**

स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत रेणापूर नगरपंचायतीला राज्य शासनाकडून मिळालेल्या सक्शन मशीनचा भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते शुक्रवारी लोकार्पण करण्यात आले.

राज्य शासनाच्या वतीने स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत मागील काळात बांधकाम केलेल्या घरासह विविध इमारतीतील दुरावस्था झालेल्या अथवा भरलेल्या शौचालय टँकचा उपसा करण्यासाठी रेणापूर नगरपंचायतीला तब्बल १८ लाखाची सक्शन मशीन नुकतीच प्राप्त झाली आहे.

सदर सक्शन मशीनचे भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यावेळी नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा श्रीमती शोभाताई शामराव आकनगिरे, पंचायत समितीच्या सभापती सौ. मोनिका सूर्यवंशी, उपसभापती शरद दरेकर, नगरपंचायत पाणीपुरवठा सभापती दत्ता सरवदे, स्वच्छता निरीक्षक मेहमूद शेख, मारूफ आत्तार, विजय चव्हाण, महेश गाडे, चंद्रकांत कातळे, राजाभाऊ आलापुरे, उत्तम चव्हाण, शेख अजीम, अच्युत कातळे, गणेश चव्हाण, धम्मानंद घोडके, ईश्वर बद्दर, हनुमंत भालेराव, योगेश राठोड, रमेश चव्हाण, मनोज चक्रे, परमेश्वर मोटेगावकर, सोपान सातपुते, शेख शौकत यांच्यासह अनेक जण होते.

# 150 दिवसीय ई - गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात नांदेड परिक्षेत्र अव्वल

## मा. मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांचा सन्मान

**नांदेड | प्रतिनिधी**

मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेल्या निर्देशानुसार राज्यात राबविण्यात आलेल्या 150 दिवसीय ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमाच्या मुल्यमापनात नांदेड पोलीस परिक्षेत्र कार्यालयाने राज्यातील सर्व परिक्षेत्रांत प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

दिनांक 28 मार्च रोजी, मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे संपन्न झालेल्या बक्षीस वितरण समारंभात, मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांना प्रशस्तिपत्र देऊन त्यांचा गौरव केला आहे. तत्पूर्वी, श्री उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रात केलेल्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती आयोजित समारंभात दिली.



दिनांक 7 मे, 2025 रोजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी सर्व शासकीय कार्यालयांमध्ये कार्यालयीन सुधारणा घडवून आणण्यासाठी 150 दिवसीय ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम राबविण्याचे निर्देश दिले होते. सदर कार्यक्रमांतर्गत प्रशासन अधिक लोकाभिमुख, गतिमान, पारदर्शक व तंत्रज्ञानाधारित व्हावे, या उद्देशाने विविध स्तरांवर व्यापक सुधारणा अपेक्षिल्या होत्या. यामध्ये संकेतस्थळ सुधारणा, आपले सरकार पोर्टल, ई-ऑफिस प्रणाली, डेटा डॅशबोर्ड, सोशल मीडिया एकत्रीकरण, व्हॉट्सॲपद्वारे सेवा वितरण तसेच नाविन्यपूर्ण वेब ॲप्लिकेशन या विषयांवर विशेष भर देण्यात आला होता.

त्यानुसार, पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रासाठी संकेतस्थळ नव्याने तयार करून ते अधिक सुरक्षित व नागरिकाभिमुख केले होते. संकेतस्थळावर विविध शासकीय योजना व सेवांचे केलेले एकत्रीकरण, आपले सरकार पोर्टल अंतर्गत तक्रारींची विहित वेळेतील सोडवणूक, ई-ऑफिस प्रणालीद्वारे कागदविरहित व जलद फाईल निपटारा, इंटरॅक्टिव्ह डॅशबोर्डद्वारे अचूक व अद्ययावत माहितीची उपलब्धता, याशिवाय, परिक्षेत्रातील अर्ज चौकशीच्या कामकाजासाठी सुरू केलेली ‘संवेदना’ ही AI आधारित संगणकीय कार्यप्रणाली, तक्रारदारांचे समाधान अजमावण्यासाठी दिलेली Feedback सुविधा, नांदेड परिक्षेत्राताातील गुन्हयांच्या तपासावर देखरेख ठेवण्यासाठी सुरू केलेली Eagle Eye ही प्रणाली व परिक्षेत्रातील गैरप्रकार व अवैध व्यवसायांच्या निर्मूलनासाठी सुरू केलेली हेल्पलाइन ‘खबर’ ( 91 50 100 100) या बाबी महत्त्वपूर्ण ठरल्या.

150 दिवसांच्या सदर कार्यक्रमाची मुदत दिनांक 10 जानेवारी, 2026 रोजी पूर्ण झाल्यानंतर, उर्वरित पान 2

# धर्मदाय निरीक्षक पदावर निषाद प्रकाश बोरगावकर यांची निवड; जिद्द आणि मेहनतीचे यश

**अंबाजोगाई | अशोक दळवे**

आजच्या स्पर्धात्मक युगात यश मिळवणे सोपे नसताना अपार मेहनत, सातत्य आणि आत्मविश्वासाच्या जोरावर निषाद बोरगावकर यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ग्राम महसूल अधिकारी आणि धर्मदाय निरीक्षक या महत्त्वाच्या पदांवर त्यांची निवड झाली असून त्यांच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. आपल्या जबाबदाऱ्या प्राप्त करत यशाचा मार्ग पादाक्रांत केला आहे. निषाद प्रकाश बोरगावकर यांचा हा यशस्वी प्रवास संघर्षातून उभा राहिलेला प्रेरणादायी आदर्श ठरत आहे.

लहानपणापासूनच अभ्यासात हुशार आणि ध्येयवेडे असलेल्या निषाद यांनी आपले उद्दिष्ट स्पष्ट ठेवले होते. शिक्षणाच्या प्रत्येक टप्प्यावर आलेल्या अडचणींवर मात करत त्यांनी कधीही हार मानली नाही. स्पर्धा परीक्षांचा मार्ग निवडत त्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास आणि चिकाटीच्या जोरावर हे यश मिळवले. त्यांच्या या यशामुळे त्यांनी ग्राम महसूल अधिकारी आणि धर्मदाय निरीक्षक या दोन्ही जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडण्याची तयारी दर्शवली आहे.आज अनेक युवक-युवती स्पर्धा परीक्षांची तयारी करत आहेत. अशा विद्यार्थ्यांसाठी निषाद यांची कहाणी प्रेरणादायी आहे. अपयश आले तरी खचून न जाता पुन्हा प्रयत्न करणे, स्वतःवर विश्वास ठेवणे आणि ध्येयासाठी सातत्याने काम करणे हे यशाचे



खरे सूत्र आहे, हे त्यांच्या प्रवासातून स्पष्ट होते.शेवटी, चि. निषाद प्रकाश बोरगावकर यांचा हा यशस्वी प्रवास हेच सांगतो की, स्वप्न मोठे असावे, प्रयत्न प्रामाणिक असावेत आणि ध्येयावर लक्ष केंद्रित असावे.या पदांद्वारे समाजासाठी पारदर्शक आणि प्रामाणिकपणे काम करण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला आहे. त्यांच्या या यशामुळे स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना निश्चितच प्रेरणा मिळणार असून त्यांच्या कर्तृत्वाचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा नांदेड जिल्हा दौरा कार्यक्रम

**नांदेड |** राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे रविवार 29 मार्च 2026 रोजी नांदेड जिल्ह्याच्या



दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील.

रविवार 29 मार्च 2026 रोजी मुंबई विमानतळ येथून सायंकाळी 4.15 वा. विमानाने नांदेड विमानतळाकडे प्रयाण. सायं. 5.15 वा. नांदेड विमानतळ येथे आगमन व मोटारीने हिंगोली गेट नांदेडकडे प्रयाण. सायं. 5.30 वा. "शिवनेरी" शिवसेना पक्ष कार्यालयाचे उद्घाटन. स्थळ- हिंगोली गेट नांदेड. सायं. 6 वा. मोटारीने बैल बाजार मैदान लोहा जि. नांदेडकडे प्रयाण. सायं. 6.30 वा. राज्यस्तरीय शेतकरी अधिवेशन व पक्ष प्रवेश सोहळा स्थळ- बैल बाजार मैदान लोहा जि. नांदेड. सायं. 7.30 वा. मोटारीने नांदेड विमानतळाकडे प्रयाण. रात्री 8 वा. नांदेड विमानतळ येथे आगमन व विमानाने मुंबई विमानतळाकडे प्रयाण करतील.


# 'महंत आदिनाथ महाराज, तुम्ही हे बरं नाही केलं!'; नामदेव शास्त्री स्पष्टच बोलले

**आष्टी प्रतिनिधी :**

तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री यांनी स्वतःच्या शरीरावर करून घेतलेल्या आघातावरून वारकरी संप्रदायात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणावर भगवान गडाचे महंत न्यायाचार्य डॉ. नामदेव शास्त्री यांनी अत्यंत तीव्र शब्दांत आपली नापसंती व्यक्त केली असून, "असा चुकीचा आदर्श समाजासमोर ठेवू नका," अशा शब्दांत आदिनाथ महाराजांना सुनावले आहे.

दोन आठवड्यांपूर्वी पाथर्डी-आष्टी हद्दीवरील तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज यांनी स्वतःवर वार करून घेतले होते, ज्यात त्यांच्या जननेंद्रियाचा त्याग झाला होता. या गंभीर घटनेनंतर त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. डिस्चार्ज मिळाल्यानंतर बोलताना आदिनाथ महाराजांनी स्पष्ट केले की, "हा त्याग मी स्वतःहून केला असून मला कोणाचाही त्रास नाही."

या घटनेनंतर एका हरिनाम सप्ताहाच्या कीर्तनादरम्यान डॉ. नामदेव शास्त्री यांनी या घटनेचा खरपूस समाचार घेतला. ते म्हणाले "भगवान बाबांनी वयाच्या २०-२२ व्या वर्षी शरीराला छेद दिला होता, ती परिस्थिती वेगळी होती. तुम्ही वयाची साठी गाठत आला आहात, या वयात असे करणे चुकीचे आहे. उद्या उठून कोणीही साधक स्वतःचे अंग कापेल आणि संत व्हायला बघेल. ही कसली परंपरा तुम्ही सुरू करताय?समाजाची सहानुभूती मिळवणे हे पाप आहे. संतांना समाजाचे प्रेम मिळाले पाहिजे, सहानुभूती नाही. तुमच्यावर कोणतेही आरोप नसताना हे 'कुटाणे' कशाला केले?तारकेश्वर गड ही महंतांची गादी आहे, आपण तिथे फक्त वॉचमन आहोत. मालकाच्या नावाने






आपण जगतो आहोत, त्यांची सेवा करायला मिळाली हे आपले भाग्य आहे. स्वतः संत होण्याचा प्रयत्न करू नका. माणसाने ज्ञानी असावे, स्वतःवर आघात करून घेऊ नये. संत हा शरीराला छेद देऊन नाही, तर ज्ञानाने आणि ज्ञानेश्वरीने मोठा होतो. माझे बोलणे कदाचित वाईट वाटेल, पण सत्य सांगणे गरजेचे आहे.

नामदेव शास्त्री यांनी घेतलेल्या या भूमिकेमुळे धार्मिक क्षेत्रात चर्चांना उधाण आले आहे. "पुढचा महंत निवडताना असाच आदर्श समोर ठेवला जाईल का?" असा खोचक सवालही त्यांनी उपस्थित केला आहे. शरीराला कष्ट देऊन नव्हे, तर विचारांनी समाज प्रबोधन करण्याचा सल्ला त्यांनी यावेळी दिला.

# संत तुकाराम विद्यालयात प्रदीप मुंडे यांच्या राष्ट्रीय कामगार सेनेच्या बीड जिल्हा विभाग अध्यक्षपदी निवडीबद्दल तसेच पोलीस पाटील पदाच्या निवडीबद्दल सत्कार संपन्न!









**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

संत तुकाराम विद्यालय, नागापूर कॅम्प येथे राष्ट्रीय कामगार सेनेच्या बीड जिल्हा विभाग अध्यक्षपदी प्रदीप भैय्या(बबलू शेठ) मुंडे यांची निवड झाल्याबद्दल तसेच पोलीस पाटील पदावर निवड झाल्याबद्दल किशोर काकडे व सतीश तूपसमुद्रे यांचा शाळेच्या वतीने सत्कार समारंभ उत्साहात पार पडला.

नागापूर गावच्या पोलीस पाटील पदी किशोर काकडे यांची निवड झाली असून, पठाण मांडवा गावच्या पोलीस पाटील पदी सतीश तूपसमुद्रे यांची निवड झाली आहे. त्यांच्या या यशाबद्दल विद्यालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शाळेच्या वतीने त्यांचा सत्कार शाळेचे कार्यवाहक तथा संस्थापक अध्यक्ष प्रदीप भैय्या मुंडे यांच्या हस्ते व प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

या प्रसंगी जिल्हा परिषद सदस्य प्रदीप भैय्या (बबलू शेठ) मुंडे यांच्या हस्ते दोघांचा पुष्पगुच्छ व शाल देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, "पोलीस पाटील हा गाव आणि प्रशासन यांच्यातील अत्यंत महत्त्वाचा दुवा असून गावातील कायदा व सुव्यवस्था राखण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची असते."

कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते व सेवा सोसायटीचे सदस्य कैलास सोळंके, किरण सोळंके, किरण अर्जुन सोळंके, कृष्णा सोळंके, माणिक बनसोडे,बाबासाहेब बनसोडे, शाश्वत एस्के , गणेश तुकाराम सोळंके, अण्णा काचगुंडे तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक शंकर सोळंके, उपमुख्याध्यापक एन पी मुंडे शाळेतील शिक्षक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## गोरेगाव येथे चैत्र नवरात्री अष्टमी निमित्त विशेष ललिता सहस्त्रनाम कुंकूमार्चन सेवा संपन्न





**मुंबई,(केतन भोज)**

**नागरी निवारा परिषद,गोरेगाव पूर्व येथे अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक विकास व बालविकास केंद्र,(दिंडोरी प्रणित )यांच्या वतीने नागरी निवारा परिषद,प्लॉट नं.६,गणेश मंदिर येथे,चैत्र नवरात्री अष्टमी निमित्त विशेष ललिता सहस्त्रनाम कुंकूमार्चन सेवा मोठया उत्साहात संपन्न झाली.यावेळी असंख्य महिलानी त्यांच्या कुलदेवीचा टाक,फोटो,मूर्ती वर कुंकूमार्चन करून कुलस्वामिनीचा आशीर्वाद घेतला. रामनवमी निमित्ताने समुहिक रामरक्षा व हनुमान चालीसा पठण विशेष सेवा करण्यात आली.ज्येष्ठ सेवेकरी सुनील पडवळ व श्रीधर कडू यांच्या मार्गदर्शनाखाली वरील सेवा खूप उत्साहात पार पडली.**

**धडाकेबाज कामगिरी!**

# महेशभैया डोंगरे पाटील यांच्या पुढाकाराने शिवस्मारक पुन्हा पूर्ववत

## अण्णासाहेब जाधव यांच्याकडून विशेष सत्कार

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

धाराशिव जिल्ह्यातील शिरढोण (ता. कळंब) येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकावरून उद्भवलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर, मराठा क्रांती ठोक मोर्चाचे राज्य समन्वयक महेशभैया डोंगरे पाटील यांनी केलेल्या यशस्वी मध्यस्थीबद्दल त्यांचे कौतुक होत आहे. या कार्याची दखल घेत मराठवाडा संपर्कप्रमुख अण्णासाहेब जाधव यांनी त्यांचा विशेष सत्कार केला.

### नेमकी घटना काय?

शिरढोण येथे बाळराजे दादा आवारे पाटील यांच्या संकल्पनेतून छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक उभारण्यात आले होते. मात्र, काही कारणास्तव पोलीस प्रशासनाने हे स्मारक हटवल्यामुळे परिसरात तणाव परिस्थिती निर्माण झाली होती.

### महेशभैयांचा 'ऑन द स्पॉट' निकाल-



या घटनेची माहिती मिळताच 'क्रांतीसूर्य' महेशभैया डोंगरे पाटील यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून थेट पोलीस अधीक्षक (S.P.) यांच्याशी संपर्क साधला आणि सविस्तर चर्चा केली. त्यांच्या प्रभावी संवादामुळे प्रशासनाने समजदारीची भूमिका घेत, सुस्मारक पूर्ववत करण्यात आले.

या धडाकेबाज कामगिरीबद्दल अण्णासाहेब जाधव यांनी महेशभैयांचे पुष्पहार घालून अभिनंदन केले.

कार्यकर्त्यांमध्ये उत्साह: शिवप्रेमींच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिल्याबद्दल संपूर्ण परिसरातून महेशभैयांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अखिल नारी शक्ती वस्ती विकास संस्था (रजि), घाटकोपर महाराष्ट्र यांच्या वतीने जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**घाटकोपर| केतन भोज**

समाजातील गरीब, गरजू महिला, रस्त्यावरील मनोरुग्ण, बेवारस नागरिक, अन्यायग्रस्त व बेरोजगार महिलांच्या उन्नतीसाठी निस्वार्थपणे कार्य करणाऱ्या अखिल नारी शक्ती वस्ती विकास संस्था (रजि), घाटकोपर महाराष्ट्र यांच्या वतीने जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. रविवार, दि. 22 मार्च रोजी सायंकाळी 6 वाजता काजुटेकडी, घाटकोपर (पश्चिम) येथील श्री दक्षिणमुखी हनुमान मंदिर येथे हा कार्यक्रम पार पडला. संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा व समाजसेविका संगिता सूर्यकांत मांडे यांच्या नेतृत्वाखाली तसेच खजिनदार रंगिता पवार व सर्व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी सामाजिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक, कला, क्रीडा व आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा मान्यवरांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच विविध विषयांवर उपस्थित महिलांना मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रभाग समिती अध्यक्षा व नगरसेविका अश्विनी मते यांच्यासह सुरेखा गवळी, कांचन बढे, आशा कोरडे, कांचन साळवी, रेहाना शेख, सविता चाकणे, सोनल शिंदे, तनुजा सोनवणे, उज्वला पवार, पद्मा, प्रतीक्षा शिंदे, अश्विनी इंदुलकर, नंदा गव्हाणे, सरिता डाकरे, संजय निर्माळे, महेंद्र आर. चौधरी, अरविंद जोशी, आशा कांबळे, साजिद अन्सारी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाला संस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच विभागातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सर्व मान्यवरांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक करत जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.




पान १ वरुन

# 150 दिवसीय ई - गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात नांदेड परिक्षेत्र अव्वल

परीक्षेत्रीय कार्यालयांनी केलेल्या कामगिरीचे मूल्यमापन प्रथमतः पोलीस महासंचालक कार्यालयाकडून करण्यात येऊन, त्यातून (4) परिक्षेत्रीय पोलीस महानिरीक्षक/उपमहानिरीक्षक कार्यालयांची निवड करण्यात आली होती. यात, नांदेड परिक्षेत्रीय कार्यालयाची देखील निवड करण्यात आली होती. त्यानंतर परिक्षेत्र कार्यालयांच्या कामगिरीचे अंतिम मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषद (Quality Council of India) यांनी केले होते. परिषदेने पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने केलेल्या उपरोक्त कामकाजाची दखल घेऊन परिक्षेत्रास प्रथम क्रमांक बहाल केला होता.

यापूर्वी, मुख्यमंत्री महोदयांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या 100 दिवसांच्या कृती आराखड्यात देखील नांदेड परिक्षेत्र कार्यालयाने राज्यात द्वितीय क्रमांक प्राप्त केला होता. परिक्षेत्र कार्यालयातील पोलीस अधिकारी, अंमलदार व मंत्रालयीन कर्मचारी यांचेसोबतच Rythmbytes कंपनीचे सॉफ्टवेअर इंजिनिअर हर्षानंद शर्मा, SETTribe कंपनीचे संचालक सारंग वाकोडीकर व सॉफ्टवेअर इंजिनिअर शहेबाज खान, पोलीस अंमलदार दिपक पवार यांनी अहोरात्र घेतलेल्या परिश्रमामुळेच हे यश शक्य झाले असून, या यशामध्ये नांदेड परिक्षेत्रातील प्रत्येक अधिकारी व अंमलदारांचा मोलाचा वाटा आहे, असे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी स्पष्ट केले आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# सिरसाळ्यात महावितरणचा भोंगाळ कारभार! वसुली जोरात, लाईट कोमात; नागरिक आक्रमक

## दररोज ३३ केव्हीचा बिघाड; हे गणित काय?; वीज नसतानाही अव्वाच्या सव्वा बिल आणि वसुलीसाठी होणारा तगादा

**■ सिरसाळा/अतुल बडे**

येथील महावितरण विभागाचा भोंगाळ कारभार आता चव्हाट्यावर आला आहे. एकीकडे थकीत वीज बिलांच्या वसुलीसाठी महावितरणचे कर्मचारी घरोघरी जाऊन सक्ती करत असताना, दुसरीकडे मात्र वीज पुरवठा पुरता 'कोमात' गेला आहे. गेल्या काही दिवसांपासून शिरसाळा परिसरात विजेचा खेळखंडोबा सुरू असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

सर्वात मोठा प्रश्न उपस्थित होत आहे तो म्हणजे ३३ केव्ही लाईनचा. आश्चर्याची बाब म्हणजे, या लाईनमध्ये दररोज तांत्रिक बिघाड (Fault) कसा होतो? हा नैसर्गिक बिघाड आहे की देखभाल-दुरुस्तीतील हलगर्जीपणा, असा सवाल आता नागरिक विचारत आहेत. दिवसातून दहा वेळा वीज जाणे आता शिरसाळावासीयांच्या अंगवळणी पडले आहे, पण यामुळे इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे.सिरसाळा येथील स्थानिक एम.एस.ई.बी. (MSEB) सबस्टेशनची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. या ठिकाणी नेमणूक असलेले कर्मचारी आणि अधिकारी नेमके करतात काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. वारंवार तक्रार करूनही "वरच्या लाईनचा बिघाड आहे" असे ठराविक उत्तर देऊन ग्राहकांची बोळवण केली जाते. या सबस्टेशनचा कारभार पाहणारा खरोखर कोणी जबाबदार अधिकारी आहे की हे सबस्टेशन वाऱ्यावर सोडले आहे, अशी संतप्त विचारणा ग्राहक करत आहेत. आता महावितरणचे वरिष्ठ अधिकारी याकडे लक्ष देऊन सिरसाळ्याचा वीज प्रश्न कायमस्वरूपी सोडवणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> "आम्ही नियमित वीज बिल भरतो, मग आम्हाला सुरळीत वीज का मिळत नाही? दररोज फॉल्ट होणे हे महावितरणचे अपयश आहे. जर लवकर सुधारणा झाली नाही, तर आम्ही सबस्टेशनवर धडक मोर्चा काढू."
> — एक त्रस्त नागरिक, शिरसाळा




## .संपादकीय

### एकत्रिकरणाचं भवितव्य

ज्यांच्या आग्रहाखातर दादा वेगळे झाले, त्या बहुतेक सगळ्या नेत्यांचा दोन्ही पक्षांच्या एकत्रिकरणाला विरोध होता, हे त्यांनाही माहीत होतं. त्यांचा तो विरोध आजही दिसतो आहेच. या विरोधाला काही तात्त्विक, वैचारिक आधार आहे, असं नाही. शुद्ध व्यावहारिक आहे. अजितदादांच्या वारसदारांना याची व्यवस्थित कल्पना आहे. २८जानेवारीच्या सकाळी बारामतीत दुर्दैवी विमान अपघात झाला नसता, त्यात अजितदादा पवार यांचं निधन झालं नसतं, तर आज कदाचित सर्व वृत्तपत्रांत दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकत्रिकरणाच्या बातम्यांचे मथळे असते. 'कदाचित' म्हणण्याचं कारण एवढंच, की दिशा निश्चित होती; पण प्रक्रियेचे तपशील ठरत होते. दोन्ही राष्ट्रवादी एकमेकांविरोधात सर्वोच्च न्यायालयात पोहोचले असल्याने काही तांत्रिक बाबी आडव्या येऊ शकल्या असत्या. शिवाय, राजकीय घडामोडींत कधी कोणते फाटे फुटतील, हे सांगता येत नसतं. त्यामुळे, एखादी गोष्ट प्रत्यक्ष घडत नाही, तोपर्यंत त्याबाबत खात्रीने बोलण्याला काही अर्थ नसतो. 'घड्याळ'वाल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे काही नेते 'अशी काही चर्चा सुरू असल्याचं आम्हाला माहीत नव्हतं. तसं असतं, तर दादा आमच्याशी बोलले असते' असं सुरुवातीला म्हणाले. पण, त्यानंतर संबंधितांकडून चर्चेच्या फेऱ्यांचे अनेक तपशील, चित्रफितीच दाखवल्या गेल्याने या नेत्यांकडून पुन्हा तशा प्रकारचं वक्तव्य झालं नाही. आता उघड झालेल्या एकूण तपशिलावरून अशी चर्चा सुरू होती आणि खुद्द अजितदादाच त्यासाठी आग्रही होते, असं दिसतं. या चर्चेतील खाचाखोचा ते आपल्या पक्षातील सहकाऱ्यांना किती सांगत असतील, हा प्रश्न आहे. कारण, ज्यांच्या आग्रहाखातर दादा वेगळे झाले, त्या बहुतेक सगळ्या नेत्यांचा दोन्ही पक्षांच्या एकत्रिकरणाला विरोध होता, हे त्यांनाही माहीत होतं. त्यांचा तो विरोध आजही दिसतो आहेच. या विरोधाला काही तात्त्विक, वैचारिक आधार आहे, असं नाही. शुद्ध व्यावहारिक आहे. अजितदादांच्या वारसदारांना याची व्यवस्थित कल्पना आहे. सुनेत्रा पवार यांची उपमुख्यमंत्री म्हणून निवड, पदग्रहणापूर्वीचे सोपस्कार, दिल्ली भेटीसाठीचा आग्रह या वारसदारांना समजत नाही, असं नाही. पण, आत्ताच काही भूमिका जाहीर करण्याची गरज नाही. सगळ्यांचं ऐकून, प्रत्येकाची पावलं कुठे पडतात हे नीट समजावून घेऊन मगच आपली भूमिका स्पष्ट करण्याचं त्यांनी ठरवलं असावं. कुठेही काहीही न बोलता सरकारमधील, पक्षातील; अगदी पक्ष संघटनेतील घडी बसवण्याला त्यांनी प्राधान्य दिलेलं दिसतं. आजच्या घडीला हेच धोरण योग्य आहे. अजितदादांचे वारसदार नवखे किंवा अपरिपक्व आहेत, त्यांना आपल्यालाच पुढे घेऊन जायचं आहे, असा समज कोणी करून घेतला असेल, तर त्यांना लवकरच ठेच लागण्याची शक्यता यावरून दिसते. दोन राष्ट्रवादी वेगळ्या झाल्या, तेव्हांही त्याबाबतच्या चर्चा वेगवेगळ्या पातळ्यांवर कितीतरी दिवस सुरू होत्या. तेव्हांही पक्षात आणि पवार कुटुंबात अशा दोन्ही आघाड्यांवर स्वतंत्रपणे बोलणी होत होती. दोन्ही बाजूला अग्रभागी पवार कुटुंबातील व्यक्तीच असल्याने साहजिकच त्यावेळीही 'केवळ पक्षात फूट, की कुटुंबात दरी?' अशा प्रकारच्या चर्चा झाल्या होत्या. भारतीय जनता पक्षाबरोबर जाण्यासाठी जे आग्रही होते, त्यातील प्रत्येकाची त्या आग्रहामागे वेगवेगळी कारणं होती. त्याची चर्चाही त्यानंतर पुष्कळ झाली होती. पण, तो निर्णय घेण्याच्या काळात स्वतः अजितदादा किती तणावात होते, याची कल्पना भारतीय जनता पक्षातील वरिष्ठ नेत्यांसह राजकीय वर्तुळालाही आहे. दोन राष्ट्रवादी स्वतंत्र झाल्यानंतरही सुरुवातीचे काही महिने सोडले, तर नंतर दोन्ही बाजूंनी परस्परांवरचे वार थांबले होते. विधिमंडळाच्या अधिवेशन काळात दोन्ही पक्षांचे नेते आणि आमदार किती समन्वयाने वावरायचे, हे तर जगजाहीर आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत दोन्ही पक्षांनी अनेक ठिकाणी आघाडी करण्याचा निर्णय घेतला होता. राष्ट्रवादीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिल्लीत शहा यांची भेट घेऊन त्यांना त्याची कल्पनाही दिली होती.

# परळीत भारतीय जनता पार्टीच्या वतीने पंडित दिनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान 2026 मंडल प्रशिक्षण वर्गाचे आज मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते होणार उदघाटन

**■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

परळीत भारतीय जनता पार्टीच्या वतीने पंडित दिनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान 2026 मंडल प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उदघाट्न आज मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते होणार आहे. तरी सर्व पधादिकारी, शक्तिकेंद्र प्रमुख आणि बूथ प्रमुख यांनी उपस्थित राहावे असे आवाहन तालुकाध्यक्ष राजेश गित्ते, वसंत निर्मळ, सौ.उमाताई समशेट्टे यांनी केले आहे. पंडित दिन दयाल उपाध्याय प्रशिक्षण महाभियान 2026 शिबिराच्या उदघाटक आणि प्रमुख मार्गदर्शक मा ना पंकजाताई गोपीनाथराव मुंडे साहेब (पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री महाराष्ट्र राज्य )कार्यक्रमाचे अध्यक्ष मा श्री शंकरराव देशमुख जिल्हा अध्यक्ष भाजपा उपस्थित रहाणार आहेत. भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने पंडित दिन दयाल उपाध्याय प्रशिक्षण महाभियान 2026 राबविण्यात येत आहे

सबंध राज्य भर 07 मार्च ते 14 एप्रिल 2026 पर्यंत हे अभियान राबवण्यात येणार आहे. या प्रशिक्षणातून सक्षम कार्यकर्ता आणि सशक्त संघटन हे उद्धीष्ट ठेवण्यात आले आहे. या महाभियान प्रशिक्षणात भारतीय जनता पार्टीचा इतिहास,



विस्तार, कार्य पद्धती, नवीन तंत्रज्ञाचा पक्ष कार्यात वापर, देशात आणि राज्यात सतेत आल्यावर पार्टीने केलेली विकास कामे याची माहिती, आदी विषयांवर मान्यवरांचे मार्गदर्शन होणार आहे.

तरी परळी वैजनाथतालुक्यातील व शहरातील सर्व पधादिकारी, शक्तिकेंद्र प्रमुख आणि बूथ प्रमुख यांनी आज परळीत होणाऱ्या भारतीय जनता पार्टीच्या वतीने पंडित दिनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान 2026 मंडल प्रशिक्षण वर्गाचे आज मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते होणार उदघाटन आहे. तरी भाजपचे सर्व पदाधिकारी, शक्तिकेंद्र प्रमुख, बूथ प्रमुख यांनी उपस्थित राहावे असे आवाहन तालुकाध्यक्ष राजेश गित्ते, वसंत निर्मळ, सौ.उमाताई समशेट्टे यांनी केले आहे.

# 30 मार्च रोजी दासगावच्या श्री काल भैरवाचा जत्रोत्सव!

**■ महाड : (प्रतिनिधी) महाड तालुक्यातील**

दासगाव गावचे ग्रामदैवत श्री कालभैरवाचा जत्रोत्सव दिनांक ३० मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आला असल्याची माहिती ट्रस्टचे अध्यक्ष रितेश पयेलकर यांनी दिली. सालाबाद प्रमाणे या होणाऱ्या उत्सवा मध्ये मोठ्या संख्येने भाविकांनी हजर होऊन दर्शन घेण्याचे आवाहन उत्सव कमिटी मार्फत करण्यात आले आहे.

दासगाव गावातील हे ग्रामदैवत परिसरातील गावांचे श्रद्धा स्थान आहे. मंदिरातील देवदेवतांना चांदीचे मुखवटे लावून जत्रोत्सव सुरू होतो.दरवर्षी गुढी पाडव्यानंतर येणारा या उत्सवामध्ये सर्व जाती जमातीचे लोक मोठ्या उत्साहाने सहभागी होत असतात. त्यामुळे या उत्सवाला परिसरात एक वेगळेच स्थान आहे. ३० मार्च रोजी होणाऱ्या या उत्सवानिमित्त दुपारी ३ वा. मंदिरातील देव देवतांच्या मूर्तींची स्थापना करून उत्सवास प्रारंभ होणार आहे. ४ वा. नवीन बगाडावर लाट फिरवण्यात येईल. संध्याकाळी ७:३० ते १०:३० पर्यंत परिसरातील गावातून येणाऱ्या काठ्या आणि पालख्यांचे मंदिरात वाजत गाजत मिरवणुकीने आगमन होईल. रात्री ११ वा. सव गावच्या श्री मानाई देवी च्या पालखीचे पाय घड्या घालून जोरात स्वागत तसेच त्याच वेळी या देवीचा चौक भरून बगाडावर लाट फिरवण्याचा कार्यक्रम होईल मान्यवरांचे स्वागत आणि रात्री १२ ते सकाळी ६ वाजे पर्यंत श्री जननीदेवी कला पथक कुडूक मंडणगड आणि चालकेश्वर नृत्य कलापथक व तमाशा मंडळ माहू तांबिटकर वाडी मंडणगड यांच्यामध्ये तामाशा बारीचे करमणूक कार्यक्रम होणार आहे. तरी श्री काल भैरव देवस्थान ट्रस्ट कमिटी मार्फत मोठ्या संख्येने भाविकांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



# मातृत्वाच्या भावनेतून मी तुमची सेवक म्हणून काम करतेय ; सर्व सामान्य, गोरगरीबांची कामे करताना कायम पाठिशी राहील







## ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते अंबाजोगाईत जनसंपर्क कार्यालयाचे थाटात उद्घाटन

# बीड जिल्ह्यात शत प्रतिशत भाजपची सत्ता, हेच आपले स्वप्न

**अंबाजोगाई प्रतिनिधी**

बीड हा माझा जिल्हा आहे. या जिल्ह्यावर माझे विशेष प्रेम आहे. 'आईची माया दाईला येत नसते' या पद्धतीने या जिल्ह्याच्या विकासासाठी आपली सदैव तळमळ राहिली आहे आणि राहणार आहे. मी तुमची सेवक म्हणून काम करणार आहे, यात मातृत्वाची भावना देखील आहे. मंत्री असताना मी यापूर्वीही अंबाजोगाईत जनतेच्या कामांसाठी कार्यालय सुरू केले होते.त्याच प्रथेला अनुसरून आज अंबाजोगाई येथे संपर्क कार्यालय सुरू केले आहे. हे कार्यालय सर्वसामान्य जनतेला विनासायास व विनाकष्ट जिथल्या तिथे त्यांची कामे होण्यासाठी कार्यरत राहील अशी ग्वाही राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज येथे दिली. शहरातील प्रशांत नगर येथे सुरू करण्यात आलेल्या जनसंपर्क कार्यालयाचे उदघाटन ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज झाले त्यावेळी जिल्हाभरातून आलेल्या कार्यकर्त्यांसमोर त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, गेवराईच्या नगराध्यक्षा गीता भाभी पवार ,युवा नेते अक्षय मुंदडा, बालासाहेब दोडतले, संतोष हंगे, सलीम जहांगीर, आदित्य सारडा, युद्धजित पंडित, माधव निर्मळ, गणेश कराड आदींसह भाजपाचे जिल्ह्यातील सर्व प्रमुख पदाधिकारी,कार्यकर्ते उपस्थित होते.

### प्रत्येकाची कामे व्हावी यासाठी हे कार्यालय

यावेळी बोलताना ना.पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की,जनतेची सर्व कामे जिथल्या तिथे पार पाडावी यासाठी एक सुसज्ज अशी यंत्रणा या माध्यमातून उभी करण्याचा आपला प्रयत्न आहे. मला भेटण्यासाठी राज्यभरातून येणाऱ्या लोकांचा मोठा जनसमुदाय असतो. यामध्ये सामान्य माणसाला भेटताना एकाच वेळी गर्दी झाल्याने धावपळ होते व कामेही नीट करता येत नाहीत. याला कुठेतरी शिस्त लागली पाहिजे व कामांचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे. या दृष्टीकनातून आपण संपर्क कार्यालयाच्या माध्यमातून एक सशक्त व सर्व उपयोगी अशी यंत्रणा उभी करत आहोत. या अनुषंगाने अंबाजोगाई येथील हे संपर्क कार्यालय जनतेची छोटी-मोठी सर्व कामे या ठिकाणावरून करणार आहे.लवकरच बीड येथेही अशाच पद्धतीचे संपर्क कार्यालय व जनतेच्या कामांसाठीची यंत्रणा आपण उभी करणार आहोत. त्याचप्रमाणे अन्य तालुक्यांच्या ठिकाणीही संपर्क कार्यालयाच्या माध्यमातून अशी यंत्रणा उभी करण्याचा आपला मनोदय आहे.



### मी तुमची सेवक

आपण सदा सर्वकाळ जनतेसाठी उपलब्ध असतो. परंतु विरोधकांनी कधीकाळी याच गोष्टीचा मुद्दा बनवत माझ्यावर टिका केली, नावे ठेवली आहेत. मात्र सर्वांना माहीत आहे की आपण सदैव जनतेच्या कामांसाठी उपलब्ध असतो. मुंबई असो किंवा महाराष्ट्रभरात सर्वत्र फिरत असताना प्रत्येक ठिकाणी आपण जनता दरबार व जनतेची कामे करण्यातच व्यस्त असतो. यासाठीच माझे जीवन आहे. माझ्या जीवनात देवधर्म आणि जनता पूजा याशिवाय दुसरे काहीही नाही. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या विचारावर वाटचाल करत असताना त्यांच्याच पद्धतीने काम करण्याचा सदैव आपण प्रयत्न केला आहे. मुंबई असो किंवा इतरत्र आपण देवपूजा झाल्यानंतर पहिल्यांदा लोकांच्या भेटीगाठी घेतो त्यानंतरच अन्न सेवन करतो. भेटणाऱ्यांचा लोंढा भरपूर असल्याने यामध्ये प्रत्येकाची व्यवस्थित भेट होणे.प्रत्येकाचा प्रश्न.प्रत्येकाची समस्या नीट समजावून घेणे आवश्यक ठरते. यासाठी विशिष्ट शिस्तबद्ध यंत्रणा आपण राबवत आहोत आणि गेल्या काही दिवसात ही शिस्त व याचा चांगला परिणामही दिसून येत आहे. जनतेची कामे होणे हे शेवटी अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यासाठीच ही कार्यालये कार्यरत राहतील अशी ग्वाही यावेळी पंकजाताई मुंडे यांनी दिली.

### बीड जिल्ह्यात शत प्रतिशत आपली सत्ता... हेच आपले स्वप्न

यावेळी बोलताना ना. पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की.लोकसभेला आपला झालेला पराभव जनतेच्या मनाला लागलेला आहे. या पराभवाने खचून जाऊन आपल्या काही बांधवांनी स्वतःचे जीवही गमावले आहेत. एवढे निसिम व निरपेक्ष प्रेम जनतेने आपल्या नेतृत्वावर केलेले आहे. त्यामुळे हे नेतृत्व जनतेसाठीच समर्पित असून बीड जिल्ह्यात आपला खासदार आणि सहाच्या सहा आमदार आपलेच होते. हेच यश पुन्हा एकदा आपल्याला निर्माण करून दाखवावे लागेल.. बीड जिल्ह्यात आपल्याला शतप्रतिशत यश मिळवायचे आहे. हे आपले स्वप्न आह. एखादे स्वप्न आपण बघतो आणि ते पूर्ण होत नाही असे होणार नाही. कारण आपण जी स्वप्न बघितली ती सर्वसामान्य जनता आणि या बीड जिल्ह्यासाठी बघितलेली आहेत.ही स्वप्न पूर्ण करण्यासाठी जनता जनार्दन आणि ईश्वर निश्चितच आशीर्वाद देणार असल्याची आपल्याला खात्री आहे. बीड जिल्ह्यात येणाऱ्या काळात शतप्रतिशत आपला विजय व्हावा यासाठी ठिकठिकाणी निर्माण होणारी आपली संपर्क कार्यालय मोठं योगदान देतील असा आपल्याला विश्वास आहे.



## गणित संबोध परीक्षेत कु .जानव्ही जामकर तालुक्यात प्रथम

**महागाव प्रतिनिधी**

गणित संबोध परीक्षेत एच. ई. एस. माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थिनी कु. जानव्ही मुकुंद जामकर हिने महागाव तालुक्यातून प्रथम क्रमांक मिळविला.

यवतमाळ जिल्हा गणित अध्यापक मंडळ द्वारे २०२५-२६ या शैक्षणिक सत्रात घेण्यात आलेल्या गणित संबोध परीक्षेत महागाव तालुक्यातील हिवरा(संगम)येथील एच. ई. एस. माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयातील वर्ग ५वी मधील विद्यार्थिनी कु.जानव्ही मुकुंद जामकर हिने प्राथमिक गटातून सुयश प्राप्त करीत तालुक्यातून प्रथम येण्याचा बहुमान पटकाविला. तिच्या नेत्रदिपक यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मोरेश्वर पांडे,व्यवस्थापक सतीश पांडे,मुख्याध्यापक बा. प्र.घाटगे सर,पर्यवेक्षक वि.आ.भुसारे सर, परीक्षा मार्गदर्शक शिक्षक कु. अ.यु.कांबळे मॅडम,उपाध्ये सर यांनी तिचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.जानव्ही ने आपल्या यशाचे श्रेय आपले मार्गदर्शक शिक्षक व आई वडील यांना दिले आहे.

## उत्सवात सर्वधर्मीयांनी सहभागी व्हावे : सुरज शिंदे यांचे आवाहन

**आष्टी प्रतिनिधी**

क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त आष्टी शहरात ११ एप्रिल २०२६ रोजी विविध सामाजिक, सांस्कृतिक व वैचारिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून या उत्सवात सर्वधर्मीय व सर्व समाजघटकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते सुरज किसन शिंदे यांनी केले आहे.



यावाबत बोलताना शिंदे म्हणाले की, "महात्मा फुले यांनी बहुजन समाजासह महिलांसाठी शिक्षणाची दारे उघडून समाज परिवर्तनाची नवी दिशा दिली. त्यांचे कार्य कोणत्याही एका जातीपुरते मर्यादित नसून संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी होते. मात्र सध्याच्या काळात महापुरुषांना जातीच्या चौकटीत बंदिस्त करण्याची प्रवृत्ती वाढत आहे, ही चिंतेची बाब असून ही मानसिकता बदलणे अत्यंत गरजेचे आहे."ते पुढे म्हणाले, "'विद्येविना मती गेली...' हा जीवनमंत्र देणारे फुले हे खऱ्या अर्थाने आधुनिक भारताचे शिल्पकार होते. त्यांनी शेतकरी, मजूर व वंचित घटकांच्या उन्नतीसाठी आपले संपूर्ण आयुष्य अर्पण केले. त्यामुळे त्यांची जयंती साजरी करणे हे केवळ एका समाजाचे नव्हे, तर प्रत्येक जागरूक भारतीयाचे कर्तव्य आहे. विषमता व अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने या उत्सवात सहभागी होणे आवश्यक आहे."विविध कार्यक्रमांची रेलचेल महात्मा फुले जयंतीनिमित्त ११ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता आष्टी शहरात त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात येणार आहे.

यानंतर सायंकाळी भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये विविध राज्यांतील पारंपरिक वाद्य पथकांचा सहभाग असणार आहे. याच पार्श्वभूमीवर १० एप्रिल रोजी श्री संत सावता मंदिर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच युवकांमध्ये वैचारिक जागृती घडवून आणण्यासाठी वक्तृत्व स्पर्धेसारखे कार्यक्रमही आयोजित करण्यात आले आहेत.या सर्व कार्यक्रमांमध्ये शहर व परिसरातील नागरिक, युवक, माता-भगिनी तसेच सर्व समाजघटकांनी कोणताही भेदभाव न करता मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि क्रांतीसूर्य महात्मा फुले यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करावी, असे आवाहन सुरज शिंदे यांनी केले.



## महागावच्या श्री अभ्यासिकेचा विद्यार्थी अभिजीत शिंदे अकोला पोलीस दलात निवड

**महागाव (प्रतिनिधी):**

महागाव येथील श्री कॉम्प्युटर द्वारा संचालित श्री अभ्यासिका मधील विद्यार्थी अभिजीत गजानन शिंदे (रा. वाघनाथ, ता. महागाव, जि. यवतमाळ) यांची अकोला पोलीस दलात निवड झाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

अभिजीत शिंदे हा श्री अभ्यासिकेचा पहिला विद्यार्थी असून त्याने आपल्या प्रबळ इच्छाशक्ती आणि अथक परिश्रमाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. त्याच्या या यशामुळे श्री अभ्यासिका तसेच संपूर्ण महागाव तालुक्याचा गौरव वाढला आहे.

यावेळी श्री अभ्यासिकेचे संचालक मंगेश वानखेडे यांनी अभिजीतचे अभिनंदन करून त्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच अभ्यासिकेतील इतर विद्यार्थ्यांनीही अभिजीतच्या यशाबद्दल आनंद व्यक्त करत त्याला शुभेच्छांचा वर्षाव केला.

अभिजीतचे हे यश त्याच्या जिद्दीचे, सातत्यपूर्ण प्रयत्नांचे आणि कठोर मेहनतीचे फलित असून, त्याने इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. त्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि पोलीस दलातील यशस्वी कारकिर्दीसाठी सर्व स्तरातून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# रेणापूर पंचायत समितीतील नूतनीकरण दालनाचा आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते शुभारंभ

**लातूर प्रतिनिधी**

रेणापूर पंचायत समितीतील सभापती, उपसभापती आणि गटविकास अधिकारी यांच्या नूतनीकरण करण्यात आलेल्या दालनाचा शुभारंभ लातूर ग्रामीणचे आ. श्री. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते करण्यात आला.

जिल्हा परिषद पंचायत समिती या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीनंतर भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वात रेणापूर पंचायत समितीवर भाजपा मनसे युतीचा झेंडा फडकला आणि सभापतीपदी सौ. मोनिका सूर्यवंशी तर उपसभापती पदी शरद दरेकर यांची निवड करण्यात आली.

रेणापूर पंचायत समितीतील सभापती, उपसभापती आणि गटविकास अधिकारी यांच्या दालनाचे सुसज्ज असे नूतनीकरण करण्यात आले असून या नूतनीकरण करण्यात आलेल्या दालनाचा लातूर ग्रामीणचे आ. श्री. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते शुक्रवारी शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी तहसीलदार प्रशांत थोरात, सभापती सौ. मोनिका सूर्यवंशी, उपसभापती शरद दरेकर, रेणापूरच्या नगराध्यक्षा शोभाताई आकनगिरे, गटविकास अधिकारी सुमित जाधव, सदस्या शितल राऊतराव, महेंद्र गोडभरले, अनिल भिसे, ॲड. दशरथ सरवदे, वसंत करमुडे, लक्ष्मण यादव, रमेश कटके, ओम चव्हाण, अशोक राठोड, निवृत्ती छिद्रे, नामदेव बोंबडे, राम मोरे, संतोष चव्हाण, अजय राठोड, गोपाळ पडिले, अच्युत कातळे, श्रीकृष्ण पवार, गणेश चव्हाण, उत्तम चव्हाण, श्रीमंत नागरगोजे, अजित पाटील, सुरेश बुड्डे, अंबादास राठोड, राजू आलापुरे, शिवाजी जाधव, राजकुमार मानमोडे यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**आ. रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वात रेणापूर पंचायत समितीवर भाजपा मनसे युतीचा झेंडा फडकला**